# ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दूरध्वनी .: ०२३१-२६६६००१, २६६६००२
फॅक्स क्र. : ०२३१- २६६६००१
E-mail : cgrfkolhapur@mahadiscom.in

महावितरण

कोल्हापूर परिमंडल,
विद्युत भवन", २रा मजला,
ताराबाई पार्क, कोल्हापूर- ४१६ ००३.

संदर्भ क्रमांक : काअ//ग्रातनिमं/ केस क्र.१६ ते ३६/२०१४-१५/८६ दिनांक : १८.६.२०१४

## अंतरिम आदेश - केस क्र.१६ ते ३६/२०१४-१५

| | | |
|---|---|---|
| | श्री.दीपक शंकर गुरव,<br>यादव कॉलनी,पेठ वडगांव,<br>जिल्हा - कोल्हापूर. व इतर २० यंत्रमागधारक ग्राहक | अर्जदार |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर. | पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, जयसिंगपूर. | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभागीय कार्यालय, पेठ वडगांव. | |

# ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दूरध्वनी क्र. : ०२३१-२६६६००१, २६६६००२
फॅक्स क्र. : ०२३१- २६६६००१
E-mail : cgrfkolhapur@mahadiscom.in

महावितरण

कोल्हापूर परिमंडल,
" विद्युत भवन "२ रा मजला,
ताराबाई पार्क, कोल्हापूर- ४१६ ००३.

क्रमांक : काअ//ग्रातनिमं/अंतरिम केस क्र.१६ ते ३६ /१४-१५/८६ दिनांक : १८.०६.२०१४

**अंतरिम आदेश केस क्र.१६ ते ३६/१४-१५**

## अंतरिम आदेश

सदरहू तक्रारीमध्ये आजपर्यंतचा ग्राहकाचा वीजपुरवठा खंडित करु नये असे आदेश देण्यात आले. वितरण कंपनीस नोटीस काढण्यात आली. कंपनीने तात्पुरते म्हणणे दाखल केले.

सुनावणीच्या दरम्यान ग्राहकाने यापूर्वी कबुल केलेप्रमाणे दिवाणी कोर्टात दाखल केलेले दावे काढून घेण्याची प्रक्रिया सुरु केली. केस क्र.२१ व २३ मधील दाव्यांचे दिवाणी कोर्टात आदेश झाले. इतर सर्व तक्रारी १६,२६,२७, २४,२५,२८, १७,१८,१९,२०, २२,२९,३०, ३१ आणि ३२,३३,३४,३५,३६ मधील अर्जदारांनी १४.६.२०१४ रोजी न्यायालयात दावे काढून घेण्यासाठी अर्ज केले आहेत. अद्याप आदेश झाले नाहीत असे मंचासमोर लिहून दिले.

तक्रारीतील मजकुर, वितरण कंपनीच्या अंतरीम अहवालाचे अवलोकन करता या सर्व तक्रारींतील कारणांची वितरण कंपनीच्या क्ष नमुन्यात IGRC मध्ये सुनावणी होणे आवश्यक आहे. कारण ग्राहकाने मुळ रक्कम भरली असल्याचे वितरण कंपनीस मान्य आहे. व्याज व दंडाबद्दल वाद आहे. चुकीची credit Adjustment बाबत सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. यापूर्वी ग्राहकांनी मंचासमोर चालू बिले भरण्याची तयारी आहे असे मान्य केले होते. आज ही तशी तयारी दर्शविली.

मंचाचे मते प्रत्येक ग्राहकाने वादातील बिलाचेबद्दल प्रथम क्ष फॉर्ममध्ये आदेश होईपर्यंत चालू बिलाची रक्कम भरणेचे अटीवर मंचाच्या ७ जून,२०१४ चा अंतरीम आदेश पुढील आदेश होईपर्यंत चालू ठेवणे योग्य व कायदेशीर होईल.

## आदेश

१. सर्व तक्रारी अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. ग्राहकाने वीज वापराचे चालू मासिक बील भरणेचे अटीवर ७ जून,२०१४ चा अंतरीम आदेशाप्रमाणे ग्राहकाचा वीजपुरवठा खंडित करु नये व पुढील आदेश होईपर्यंत चालू ठेवण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (जी. सी. लेले) | (जी.बी.पानकर) | ( बी.जी. पवार ) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |
| ग्रा.त.नि.मंच कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच कोल्हापूर |